घडलंय बिघडलंय

# कंपनीची स्पर्धा भाऊ-बहिणींना फायदा



रक्षाबंधन म्हणजे भारतीय नागरिकांचा महत्त्वाचा सण. बहिणीने भावाला राखी बांधून आदर व्यक्त करण्याचा हा सण. या दिवशी आवर्जून बहीण वेळ काढून भावाला भेटत असते. पण सध्याचे जीवन हे अतिशय गतिशील झालेले आहे. ठरलेल्या दिवशी भेटता येईलच असे नाही. म्हणून भाऊ-बहिणीतील नाते प्रस्थापित करण्याचे कोणी टाळत नाहीत. ईमेल, मोबाईल, पोस्ट यांच्याबरोबर कुरिअर सेवेला भरपूर महत्त्व प्राप्त झालेले आहे. ज्या दिवशी रक्षाबंधन आहे त्यादिवशी राखी किंवा भेटवस्तू पोहोचावी हा त्यापाठीमागचा हेतू असतो. पोस्ट खाते याबाबतीत तत्पर सेवा दाखवत असली तरी आजच्या घडीला खासगी कुरियर सेवा ही अनेकांना महत्त्वाची वाटायला लागलेली आहे. ज्या कुरियर सेवेचे भारतात, भारताबाहेर जाळे पसरलेले आहे त्यांच्यासाठी हा सण म्हणजे व्यवसायाचे साधन झालेले आहे.फेडेक्स एक्स्प्रेस आणि कॅफे कॉफी डे यांनी मंदिरा बेदीला ब्रॅण्ड ॲम्बेसेडेर बनवून यंदाच्या राखी सणाचे महत्त्व वाढवलेले आहे. त्यामुळे अशी सेवा पुरवणाऱ्या कुरियर कंपनीची मोठी तारांबळ उडालेली आहे. डीटीडीसी ही भारतातली सर्वात मोठी एक्सप्रेस सर्व्हिस कंपनी मानली जाते. दहा हजारांहून अधिक भारतातल्या पिनकोडशी त्यांचा रोजचा व्यवहार आहे. बाहेरच्या दोनशे चाळीस आंतरराष्ट्रीय शहरांत त्यांची सेवा पूरविली जाते. अभिषेक चक्रवर्ती हे या कंपनीचे एक्झीक्यूटीव्ह डायरेक्टर आहेत. त्यांनीसुद्धा एक अभिनव कल्पना सुचविली आहे. बहिणीने पाठवलेली राखी त्याचदिवशी भावाला मिळेल अशी तत्पर सेवा यात केलेली आहे. इतकेच काय तर भावाने बहिणीला गिफ्ट देण्याची तयारी दाखवली तर तीही फारशी तडजोड न करता पोचवली जाणार आहे.



© Navakal